# पंतप्रधान मोदींनी केली शहा, सीतारामन यांच्याशी चर्चा



**नवी दिल्ली :** कोरोनामुळे प्रभावित झालेल्या अर्थव्यवस्थेला पुन्हा रुळावर आणण्यासाठी केंद्र सरकारकडून लवकरच दुसरे प्रोत्साहनपर पॅकेज अपेक्षित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची याबाबत बैठक झाल्याची माहिती आहे. पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि निर्मला सीतारामन यांच्यासोबतच्या या बैठकीला अनेक वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. आता एमएसएमई म्हणजेच सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग मंत्रालयासोबतही बैठक होणार असल्याचे वृत्त आहे. या मंत्रालयाकडून देशातील अर्थव्यवस्थेत पुन्हा जीव ओतण्यासाठी एक सादरीकरण केले जाणार असून, आवश्यक उपाययोजना सुचवल्या जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. पंतप्रधान मोदींनी यापूर्वीच नागरी उड्डाण, कामगार आणि ऊर्जा मंत्रालयासह विविध मंत्रालयांसोबत बैठक घेतली आहे.

रविवार, ३ मे २०२०

• वर्ष १२ • अंक २८६

www.ramprahar.com

# राम प्रहर

• पाने ४ • किंमत ₹२ • रायगड

## अंतरंग

नवी मुंबईत अफवांचे पीक; परराज्यात जाण्यासाठी गर्दी/२

मोदी भोजन कम्युनिटी किचनसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद/३

ऑनलाइन किक बॉक्सिंग स्पर्धेस प्रतिसाद/४

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीला यश

# ‘त्या’ कर्मचार्‍यांची होणार मुंबईतच व्यवस्था

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई महापालिकेत पनवेल व इतर भागातून अत्यावश्यक सेवेत रोज कामावर येणार्‍या कर्मचार्‍यांची संख्या मोठी आहे. त्यांच्यामुळे इतर शहरांमध्ये कोरोनाचा संसर्ग वाढत आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून पावले उचलण्याची गरज होती. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांनी याकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले. यासंदर्भात मुंबई महापालिकेतर्फे या कर्मचार्‍यांची सोय मुंबईमध्येच हॉटेलमध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्वप्रथम केलेल्या मागणीला यश आले असून, पनवेलकरांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### ४ मेपासूनचा पनवेल बंद रद्द

मागणीला यश आल्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलकरांशी संवाद साधून मुंबई महापालिका आणि समस्त पनवेलकरांचे आभार व्यक्त करून स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घ्या, असे आवाहन सर्वांना केले आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे की, पनवेल आणि परिसरातील मुंबईमध्ये अत्यावश्यक सेवेचे काम करणारे जे जे सेवाकर्मी आहेत ते खर्‍या अर्थाने कोरोना वॉरिअर्स आहेत. त्या सगळ्यांची राहण्याची व्यवस्था



कोरोना संक्रमण दूर होईपर्यंत मुंबईमध्येच करावी, अशी मागणी केली होती. त्याला मुंबईच्या आयुक्तांनी प्रतिसाद दिला आहे. त्यांच्या माध्यमातून आदेश दिल्यामुळे या सेवाकर्मींची कामाच्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था होणार आहे. त्याबद्दल मी मुंबई महापालिका आयुक्तांचे आभार व्यक्त करीत आहे, तसेच राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे मागणी करतो की, जशी मुंबई महापालिकेने व्यवस्था केली आहे तशीच मुंबईमध्ये काम करणार्‍या पोलीस, बेस्ट आदी सेवा देणार्‍या सर्वांची व्यवस्था कोरोनाचे संक्रमण दूर होईपर्यंत मुंबईमध्येच करण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सरकारने किंवा मुंबई महापालिकेने पावले उचलावीत.

पनवेलच्या दृष्टिकोनातून व्यापारी, संघटना, नगरसेवक, नागरिकांनी सर्वांनी मिळून मुख्यमंत्र्यांकडे तगादा लावला असल्याचे नमूद करून आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे आभारही व्यक्त केले आहेत. पनवेल क्षेत्रात वाढणारे संक्रमण पाहता वैद्यकीय सेवा वगळून ४ मेपासून बंदची हाक दिली होती. आता त्यावर मुंबई महापालिकेने आपल्याला प्रतिसाद देऊन सेवाकर्मींची व्यवस्था मुंबईमध्ये करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ४ मेपासूनचा बंद रद्द करण्यात आला आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाहीर केले आहे, परंतु समस्त पनवेलकरांनी घरातच राहावे, सुरक्षित राहावे आणि कोरोनाचे संकट पळवून लावण्यासाठी सर्वांनी मिळून सहकार्य करावे, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांना केले आहे.

# पनवेल तालुक्यातील रुग्णांचा आकडा शंभरीपार

**पनवेल : प्रतिनिधी**




पनवेल महापालिका क्षेत्रात नऊ आणि ग्रामीण भागात दोन पॉझिटिव्ह रुग्ण शनिवारी (दि. २) आढळल्याने तालुक्यात कोरोनाच्या रुग्णांचे शतक पूर्ण झाले आहे. आजच्या रुग्णांमध्ये अत्यावश्यक सेवेसाठी मुंबईला जाऊन पॉझिटिव्ह झालेल्यांच्या घरातील सात रुग्णांचा समावेश आहे. गोवंडी येथील यूएसव्ही फार्मा कंपनीतील कामगार किंवा त्यांच्या घरातील व्यक्तीही यात आहेत. पनवेल महापालिका क्षेत्रात कोरोनाचे आता ९० पॉझिटिव्ह रुग्ण झाले आहेत. ग्रामीणमध्ये दोन नवीन रुग्णांची भर पडल्याने तालुक्यातील रुग्णांची संख्या १०४ झाली आहे, तर उरणमधील एक नवा रुग्ण मिळून जिल्ह्याचा आकडा १२२वर गेला आहे.

आजच्या पॉझिटिव्हमध्ये कामोठ्यातील सात आणि नवीन पनवेल व कळंबोलीतील प्रत्येकी एकाचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे. यामध्ये पूर्वीच्या कोरोना पॉझिटिव्हच्या घरातील सात जणांचा समावेश आहे, तर एकाला कामाच्या ठिकाणी संसर्ग झाल्याची शक्यता आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील कामोठ्यात सात रुग्णांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे. त्यापैकी सेक्टर ७मधील रुग्णाचे वडील मुंबईत सफाई कामगार असून, त्यांना कोरोनाची लागण झाली होती. सेक्टर ७मधील महिला मुंबईला सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये नर्स आहे. सेक्टर २१मधील ३३ वर्षीय महिला आणि तिच्या सात आणि एक वर्षीय मुलांचा रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे. या महिलेचा पती गोवंडी येथील यूएसव्ही फार्मा कंपनीत कस्टम व्यवस्थापक आहे. त्याचा रिपोर्ट पॉझिटिव्ह होता. सेक्टर ११ मधील ३२ वर्षीय महिलेचा भाऊ मुंबईला महापालिकेत सफाई कामगार असून, त्याचा रिपोर्ट पॉझिटिव्ह होता. सेक्टर ३४ मधील ३६ वर्षीय व्यक्ती गोवंडी येथील यूएसव्ही फार्मा कंपनीत कामाला आहे. (पान २ वर..)



**कोपर-गव्हाण (ता. पनवेल) : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजपतर्फे गरीब, गरजूंना अन्नधान्याचे वाटप शनिवारी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच हेमलता भगत, ग्रामपंचायत सदस्य विजय घरत, योगिता भगत, सुनीता घरत, ज्येष्ठ नेते अनंताशेठ ठाकूर, सुधीर ठाकूर, अजय भगत, सुनील पाटील, गोवर्धन घरत, माई भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## ‘आयएफएससी म्हणजे आपले अपयश लपवण्यासाठी छाती बडवण्याचा प्रकार’

**मुंबई : प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) आजही मुंबईत शक्य आहे आणि आपल्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत त्यासाठी मोठा पुढाकार घेण्यात आला, पण आज जे गळे काढून ओरडत आहेत त्यांनी २००७ ते २०१४ या काळात काय केले याचे उत्तर आधी दिले पाहिजे, असे माजी मुख्यमंत्री आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. आपले अपयश लपवण्यासाठी छाती बडवण्याचा हा प्रकार आहे, असेही ते म्हणाले.

फडणवीसांनी पुढे सांगितले की, उच्चाधिकार समितीने २००७मध्ये मुंबईत आयएफएससीच्या स्थापनेबाबत अहवाल केंद्र सरकारला सादर केला होता. २०१४पर्यंत तेव्हा ना महाराष्ट्र सरकारने अधिकृतपणे प्रस्ताव सादर केला, ना केंद्रातील सरकारने विचार केला. (पान २ वर..)

## उरणमधील पोलिसाच्या पत्नीलाही संसर्ग

**उरण :** मोरा येथील कोरोनाग्रस्त पोलीस शिपायाच्या पत्नीलाही या विषाणूचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. पोलिसाच्या संपर्कात आलेल्या नऊ जणांना क्वारंटाइन करण्यात आले होते. त्यापैकी त्याच्या पत्नीचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. या नव्या रुग्णामुळे उरण तालुक्यातील कोरोनाबाधितांची संख्या सहा झाली आहे. (पान २ वर..)

राम प्रहर

### वाचकांना सूचना

लॉकडाऊन काळात मुद्रित माध्यमांना कामकाजास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार चार पानी अंक छपाई करून काही भागांत विक्रीसाठी उपलब्ध करीत आहोत. याशिवाय हा अंक सोशल मीडियात व www.ramprahar.com या वेबसाईटवरसुद्धा असेल. वाचक आणि सर्व हितचिंतकांनी यापुढेही आम्हाला सहकार्य करावे, ही विनंती **–मुख्य संपादक**

## मुरूडमधील पेट्रोलपंपांवर उसळली वाहनांची गर्दी

### गुन्हा दाखल करण्याचे तहसीलदारांचे आदेश



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात असलेल्या विहूर व शिघ्रे येथील पेट्रोलपंपांवर मालकांनी सर्वसामान्य नागरिकांना मागेल तेवढे पेट्रोल दिल्याने शनिवारी (दि. २) या दोन्ही पंपांवर मोठी गर्दी जमली होती. दुचाकी वाहनांच्या रांगा दूरवर पसरून सोशल डिस्टन्सिंगलाही हरताळ फासला गेला. दरम्यान, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असल्याचे तहसीलदारांनी स्पष्ट केले आहे.

कोरोनामुळे लॉकडाऊन व संचारबंदी लागू असल्याने पेट्रोलपंपावर फक्त अत्यावश्यक सेवेत असलेल्या पासधारकांनाच इंधन दिले जात आहे. इतर सामान्य नागरिकांना मनाई आहे. त्यामुळे पेट्रोलपंपांवर गर्दी पाहावयास मिळत नव्हती, मात्र शनिवारी विहूर व शिघ्रे या दोन्ही पंपमालकांनी सामान्य नागरिकांना मागेल तेवढ्या रकमेचे पेट्रोल दिल्याने आजूबाजूच्या नागरिकांनी मोठी गर्दी केली व सोशल डिस्टन्सिंगच्या नियमाची पायमल्ली केली.

याबाबत मुरूडचे तहसीलदार गमन गावित यांना विचारणा केली असता शासकीय आदेशाचे पालन न करणार्‍या पेट्रोलपंपांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश पोलिसांनी दिले असल्याचे त्यांनी सांगितले, तर पेट्रोल पंपमालकांनी आपली बाजू मांडताना सांगितले की, जिल्हाधिकार्‍यांच्या ३० एप्रिलच्या आदेशान्वये सर्वसामान्य नागरिकांना पेट्रोल वितरित करण्याचे आदेश निर्गमित केले होते. त्याप्रमाणे आम्ही पेट्रोल वितरित केले.

# महाडमध्ये बेकायदेशीर मद्यसाठा जप्त

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरापासून जवळच असलेल्या चांभारखिंड गावच्या हद्दीत एका गॅरेजमधील कारच्या आत असलेला बेकायदेशीर मद्याचा साठा पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### तिघांवर गुन्हा दाखल

महाड शहरापासून एक किमी अंतरावर असलेल्या चांभारखिंड हद्दीत कल्पतरू बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये सुहास सुरेश कुडपाने यांच्या मालकीची हुंदाई कार (एमएच ०६-बीओ ७४९६)मध्ये देशी-विदेशी मद्याच्या बाटल्या असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याप्रमाणे पोलीस पथकाने गुरुवारी (दि. ३०) रात्री ११.३०च्या सुमारास छापा मारला असता कारमध्ये मद्यसाठा आढळून आला. पोलिसांनी १४ हजार २१० रुपये किमतीची दारू आणि १० लाखांची कार असा एकूण १० लाख १४ हजार २१० रुपयांचा माल जप्त केला. या प्रकरणी सुहास कुडपाने यांच्यासह अरुण रामचंद्र जाधव आणि सुनील धोंडू पेढारी या तिघांविरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (इ) ८३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सुरू आहे.

### निवडक

#### पालघर हत्याकांड प्रकरण; कोठडीतील आरोपीला कोरोना

**पालघर :** डहाणू तालुक्यातील गडचिंचले येथील तीन जणांच्या हत्याकांड प्रकरणातील एका आरोपीला कोरोनाचा संसर्ग झाल्याची माहिती मिळाली आहे. हा आरोपी वाडा पोलीस ठाण्याच्या कोठडीत आहे. त्याला तातडीने पालघर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

#### किम जोंग उन अखेर कार्यक्रमात प्रकटले

**प्योंगयांग :** उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष किम जोंग उन यांच्या प्रकृतीबाबत उलटसुलट चर्चा सुरू होत्या, परंतु शासकीय माध्यमांनी किम यांचा सार्वजनिक कार्यक्रमातील फोटो प्रसिद्ध केला आहे. त्यात ते एका कारखान्याचे उद्घाटन करीत आहेत. या वेळी त्यांची प्रकृती उत्तम असल्याचेही दिसत आहे.

## ‘मातोश्री’बाहेरील पोलिसांना कोरोना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात कोरोनाबाधितांची संख्या ११ हजारांपेक्षा अधिक झाली आहे. कोरोनाविरुद्धच्या या लढाईत लढणारे पोलीस आणि वैद्यकीय कर्मचारीदेखील कोरोनाबाधित झाले आहेत. त्यातच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे खासगी निवासस्थान असलेल्या वांद्रे येथील मातोश्री निवासस्थानाबाहेरील तीन पोलीस कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहेत. या तिघांनाही सांताक्रूझमध्ये क्वारंटाइन करण्यात आले आहे.

यातील दोघांनी रात्रपाळी करून शुक्रवारी घर गाठले, तर एक जण सकाळी ड्युटीवर रुजू झाल्यानंतर हा प्रकार उघड झाला.

# लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या नागरिकांचा मार्ग मोकळा

## रायगड ई-पासची जिल्हा प्रशासनाकडून सुविधा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे परराज्यातील अडकून पडलेल्या नागरिकांना आपल्या मूळ गावी परत जाण्यासाठी शासनाने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार रायगड ई-पासची सुविधा जिल्हा प्रशासनाकडून कार्यान्वित करण्यात आली आहे.

### तपासणी, क्वारंटाइन बंधनकारक

*प्रवास करण्यापूर्वी प्रत्येक व्यक्तीने ते सध्या जेथे राहत आहेत तेथील नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय किंवा नोंदणीकृत खासगी दवाखाना येथे संपर्क साधून संबंधित डॉक्टरकडून स्वत:ची तपासणी करून घेऊन वैद्यकीय प्रमाणपत्र उपलब्ध करून घेणे बंधनकारक राहील व ते वैद्यकीय प्रमाणपत्र प्रवासादरम्यान स्वत:सोबत बाळगणे तसेच स्वत:स १४ दिवस गृह विलगीकरण (होम क्वारंटाइन) करून घेणे बंधनकारक असणार आहे.*

रायगड जिल्ह्यातून परराज्यात जाऊ इच्छिणारे कामगार, पर्यटक, भाविक, विद्यार्थी व इतर व्यक्तींनी त्यांच्या राज्यात किंवा मूळ निवासाच्या इच्छितस्थळी जाण्याकरिता निश्चित कार्यपद्धती अवलंबण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. त्याकरिता शासनाने जिल्हाधिकार्‍यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून घोषित केले आहे.

यामध्ये सध्या विविध कॅम्पमध्ये जे मजूर आहेत त्यांच्याबाबतीत ते ज्या राज्यातील निवासी आहेत अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकार्‍यांना मजुरांच्या यादीसह संपर्क साधून त्यांची सहमती घेण्यात येणार आहे. संबंधित जिल्हाधिकार्‍यांकडून सहमती मिळाल्यानंतर या मजुरांना वाहनाद्वारे त्यांच्या मूळ निवासाच्या ठिकाणी पाससह पाठविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

इतर राज्यातील ज्या व्यक्ती रायगड जिल्ह्यात अडकून पडल्या असतील व ते त्यांच्या मूळ गावी वास्तव्याच्या जिल्ह्यात जाऊ इच्छित असतील, अशा व्यक्तींनी प्रवास करणार्‍या व्यक्तीच्या नावासह तसेच वाहनाचा प्रकार व क्रमांक या बाबी नमूद करून रायगड जिल्ह्यातील रायगड ई-पास या ॲपवर अर्ज करावा. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातून बाहेर राज्यामध्ये जाणारे कामगार, पर्यटक, भाविक, विद्यार्थी व इतर व्यक्तींनी https://forms.gle/fgEGNoGTxber4HRs5 या लिंकवर माहितीही भरावी.

रायगड जिल्ह्यातून बाहेर राज्यात जाणारे कामगार, पर्यटक, भाविक, विद्यार्थी व इतर व्यक्तींनी वाहतूक-प्रवास करण्यासाठी वरील गुगल लिंकमध्ये माहिती भरल्यानंतर तसेच रायगड ई-पास ॲपद्वारे अर्ज केल्यानंतर परराज्यात जाऊ इच्छिणार्‍यांसाठी जिल्हा प्रशासनाकडून ३ मेपासून परवानगी देण्यास सुरुवात केली जाणार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये परराज्यातील जे मजूर अथवा व्यक्ती अडकल्या आहेत, अशा व्यक्तींनी त्यांच्या राज्यामध्ये किंवा त्यांच्या मूळ निवासाच्या इच्छितस्थळी जाण्याकरिता दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी व जिल्हा प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी केले आहे.

# कर्जतमध्ये श्रमदानातून पाणीटंचाई दूर

### *वेणगावच्या तरुणांकडून लॉकडाऊनचा सदुपयोग*

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वेणगावमधील तरुणांनी लॉकडाऊनचा सदुपयोग करून २५ दिवसांच्या कालावधीत श्रमदान करून बुजलेला नाला साफ केला आणि पाणी वेणगावपर्यंत आणले. ऐन उन्हाळ्यात धरणात भरपूर पाणी साठल्याने या गावचा पाण्याचा प्रश्न दूर झाला आहे. सर्वच गोष्टींसाठी शासनावर अवलंबून न राहता जिद्द, एकी व श्रमदानातून हे शक्य झाले आहे.



वेणगाव या सुमारे दोन ते अडीच हजार वस्ती असलेल्या गावाला बोरिंग वगळता पाण्यासाठी अन्य कोणताही नैसर्गिक स्रोत नाही. १०-१२ वर्षांपूर्वी टाटा पॉवर हाऊसचे पाणी गावातील छोट्याशा बंधार्‍यात अडवून ते मार्च-एप्रिलपर्यंत पुरविले जात असे. राजनाला कालव्याची दुरुस्ती सुरू झाल्यानंतर पाणी येणे बंद झाले. पाणी उपलब्ध नसतानासुद्धा खोल बोअरवेल मारून इमारती उभ्या राहिल्या. परिणामी फेब्रुवारी महिन्यातच या बोअरवेल कोरड्या पडू लागल्या. अशातच कोरोनामुळे लॉकडाऊन सुरू झाला. गावातील काही तरुणांच्या मनात लुप्त झालेला नाला पुन्हा बंधार्‍यापर्यंत आणता येईल का, याबाबत विचार सुरू झाला. साधनसामग्री फारशी नसल्याने वर्गणी काढून कधी रात्रंदिवस स्वतः हातात कुदळ-फावडे घेऊन, तर कधी आवश्यकता असेल तेव्हा जेसीबी घेऊन नाल्याच्या सफाईला सुरुवात झाली.

हाती कमी दिवस होते. नंतर नाल्याचे पाणी बंद होणार होते. नया दौर चित्रपटातील ‘साथी हात बढाना’ या गीताप्रमाणे ३०पेक्षा कमी दिवसांत सुमारे २.५ किलोमीटर नाला साफ झाला. अशा प्रकारे गंगा अवतरून बंधारा भरला. लॉकडाऊनचा असा सदुपयोग केल्याबद्दल सर्व तरुणांचे अभिनंदन होत आहे.

## निवडक

### ऑफिसमधून टीव्ही, लॅपटॉपची चोरी

**पेण :** पेण शहरातील भारती कॉ. ऑ. हौसिंग सोसायटी राजू पोटे मार्ग येथील ऑफिसची बंद खिडकी तोडून अज्ञात चोरट्याने इलेक्ट्रॉनिक साहित्य चोरून नेले आहे. फिर्यादी (रा.बोहरी गल्ली रोहा ता.रोहा) यांच्या भारती को.ऑ.हौसिंग सोसायटी राजु पोटे मार्ग पेण येथील ऑफिसची २० मार्चला सायंकाळी ४.३० वाजल्यापासून ते २८ एप्रिलला सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत बंद होते. यादरम्यान अज्ञात चोरट्याने या ऑफिसची बंद खिडकी उघडून आय प्रवेश करून ऑफिसमधील टीव्ही, लॅपटॉप असे एकूण २५ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. याबाबत पेण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सहाय्यक फौजदार बी.बी. पाटील हे करीत आहेत.

### पोलीस पदक जाहीर

**पनवेल :** नवी मुंबई हद्दीतील परिमंडळ १ व परिमंडळ २ विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचलनालयातर्फे पोलीस पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनकर मोहिते, पोलीस निरीक्षक शिरिष पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर देवडे, पोलीस हवालदार सुनील कानगुडे, बालाजी थोरात, प्रशांत काटकर, लहू भोसले, अनिल पाटील, चंद्रशेखर भोसले, जितेंद्र म्हात्रे, अनिल यादव, वैभव होले, संभाजी पाटील, अतुल शिंदे व बाबासाहेब काथरे यांना ही पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



**मुंबई : महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गणेश मूर्तिकार कै. विजय खातू यांच्या लालबाग येथील गणेश टॉकीजजवळच्या कारखान्याला शनिवारी अचानक आग लागली.**

# वाशीच्या विष्णूदास भावे नाट्यगृहात अफवेमुळे सोशल डिस्टन्सिंगचा फज्जा

**नवी मुंबई : बातमीदार**

कोरोनाने हाहाकार माजवलेला असतानाच अफवेच्या पिकांना देखील उत आलेला आहे. याचा प्रत्यय शनिवारी (दि. २) नवी मुंबईत आला नि वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात अर्ज करण्यासाठी नागरिकांच्या रांगा पाहायला मिळाल्या. मात्र यामुळे सोशल डिस्टन्सिंगचा फज्जा उडालेला पाहायला मिळाला.

### परराज्यात जाण्यासाठी एकच गर्दी

परराज्यात जाण्यासाठी नवी मुंबई महापालिकेकडून पास मिळत असल्याची आवई उठल्याने लॉकडाऊनमुळे नवी मुंबईत अडकून बसलेल्या परप्रांतीयांनी वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात एकच गर्दी केली. भावे नाट्यगृह प्रवेशद्वाराच्या दुतर्फा या लांबच लांब रांगा लागल्या दिसुन आल्या.

शनिवारी सकाळपासून अर्ज वाटपाची अफवा पसरल्याने नवी मुंबईतील परप्रांतीय नागरिकांनी वाशी विभाग कार्यालयाजवळ गर्दी केली होती. मात्र विभाग कार्यालयाजवळ कोविड तपासणी सेंटर असल्याने या सर्वांना तिथून हुसकावून लावण्यात आले. यामध्ये विष्णुदास भावे नाट्यगृहात अर्ज वाटप करत असल्याची बातमी पसरताच या सर्व नागरिकांनी विष्णुदास भावे नाट्यगृह गाठले. हळूहळू ही गर्दी वाढत गेली. मुख्य म्हणजे नवी मुंबई हे कोरोनाचे हॉटस्पॉट क्षेत्र ठरत असतानाच ही गर्दी वाढल्याने सर्वत्र गोंधळ उडाला. सोशल व फिजिकल डिस्टन्सिंग देखील राखले गेले नसल्याचे या गर्दीमुळे उघड झाले. तर अनेकांनी मास्क देखील तोंडाला बांधले नव्हते. त्यामुळे हादरलेल्या वाशी पोलिसांनी तातडीने भावे नाट्यगृहाकडे धाव घेतली व नागरिकांना तिथून हुसकावून लावले. इतक्या मोठ्या प्रमाणात नागरिक का जमले? कोणी अफवा पसरवली हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे.

राज्यात व परराज्यात अडकलेल्या मजुरांना, कामगारांना व नागरिकांना आपल्या घरी जाता यावे यासाठी केंद्राने विशेष ट्रेन सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार त्या त्या पोलीस क्षेत्रांतर्गत असलेल्या डीसीपिंना परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार नागरिकांनी अर्ज करायचा आहे. त्यावर आधार कार्ड, पत्ता, फोन नंबर व कोठे जयकर आहे तो पत्ता नमूद करायचा आहे. स्थानिक पोलीस स्थानकात अर्ज केल्यावर त्यास परवानगीदेण्यात येणार आहे. त्यामुळे पालिकेच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या विष्णुदास भावे नाट्यगृहात ही गर्दी कशी काय जमली? असा प्रश्न निर्माण झाला आहे. तर फेक मेसेज पाठवून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

**सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार परराज्यात जाण्यासाठी पालिकेच्या विभागनिहाय कार्यालयातून अर्ज देण्यात येणार होता. त्यानुसार वाशी विभाग कार्यालयात अर्ज घेण्यासाठी गर्दी जमली होती. मात्र वाशी विभाग कार्यालयाच्या बाजूला क्वारंटाइन कक्ष असल्याने हे अर्ज विष्णुदास भावे नाट्यगृहात पाठवण्यात आले होते. त्यामुळे वाशी विभागात राहणाऱ्या नागरिकांनी भावे नाट्यगृहाजवळ अर्ज घेण्यासाठी गर्दी केल्याचे दिसून आले.**

**१ मे रोजी शासनाने काढलेल्या अध्यादेशात पालिकेकडुन अर्ज वाटपाचे अतिरिक्त काम काढून ते संपूर्णपणे स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये दिले आहे. पोलीस स्थानकांतून अर्ज घेऊन तो नागरिकांनी भरायचा आहे. त्यासोबत स्वतःची कोविड टेस्ट करून मेडिकल टेस्ट रिपोर्ट अर्जासोबत द्यायचा आहे. तो अर्ज स्थानिक पोलीस स्थानकात दिल्यावर नागरिकांना आपल्या गावी जाण्याची परवानगी मिळणार आहे.**

# विदेशी दारू विक्री करणारा अटकेत

## नवी मुंबई पोलिसांची कारवाई

**उरण : प्रतिनिधी,**
**पनवेल : वार्ताहर**

जगभरात कोरोना संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात वाढत असतांना पोलीस यंत्रणा व्यस्त असल्याचा गैरफायदा घेत नवी मुंबई ऐरोली येथे विदेशी दारू विक्रीसाठी आलेल्या इसमास नवी मुंबई मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने रंगेहात पकडून मुद्देमुलासह अटक केली आहे.




पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार नवी मुंबई ऐरोली येथील सेक्टर ९ येथे विदेश दारू विक्रीसाठी एक व्यक्ती येणार असल्याची खबर नवी मुंबई मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर यांना मिळाली होती. त्यानुसार या पथकाने ऐरोली येथे सापळा रचून, नवी मुंबई कोरोना व्हायरस या साथीचे रोगाचा प्रादुर्भाव टाळावा, या करिता शासनाने प्रतिबंधित व पारित केलेल्या अधिसूचनाचे उल्लंघन करून आरोपी व्यक्ती नामे किरण रमेश शिवनगी (वय २५, धंदा–नोकरी, रा. घणसोली, नवी मुंबई) हा बेकायदेशीरपणे विदेशी दारू विक्रीसाठी आला असताना मिळून आल्याचे उघड झाले आहे.

त्याचेकडुन ३८ हजार ३५० रुपये किंमतीच्या विदेशी दारूच्या १० बाटल्यांसह २५ हजार रुपये किंमतीची होंडा स्कुटी क असा एकुण ६३ हजार ३५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला असुन त्याचे विरूध्द रबाळे पोलीस ठाण्यात भा. दं. वि. कलम १८८, २७०, २७१ सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) सह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५चे कलम ५१(ब) सह साथीचे रोग अधिनियम १८९७ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, या प्रकरणी नवी मुंबई मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोलीस पथक अधिक तपास करीत आहेत.

# परराज्यात जाण्याची माहिती देण्यासाठी तहसील कार्यालयांबाहेर गर्दी

**अलिबाग : प्रतिनिधी**

परराज्यातील रायगड जिल्ह्यात अडकलेले जे नागरिक आपल्या राज्यात परत जाऊ इच्छितात त्यांची माहिती जमा केली जात आहे. प्रत्येक तहसील कार्यालयात परराज्यातील नागरिकांची माहिती गोळा करण्यास सुरुवात झाली आहे. आपली माहिती देण्याकरिता तहसील कार्यालयांत हे नागरिक गर्दी करू लागले आहेत.



राज्यात अडकलेल्या परराज्यातील नागरिकांना आपापल्या राज्यात पाठविण्यासाठी सरकारने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. रायगड जिल्ह्यातही याबाबतची तयारी जिल्हा प्रशासनाकडून सुरू आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालयात बाहेर जाणाऱ्या व्यक्तींची माहिती संकलन करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी गर्दी केली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी लागू झाल्याने रायगड जिल्ह्यात हजारो परराज्यातील नागरिक अडकले आहेत. काम नसल्याने या नागरिकांची आर्थिक कोंडीही झाली आहे. सार्वजनिक वाहतूक सेवाही बंद आहे. त्यामुळे हे लोक आपल्या मूळगावी जाऊ शकत नाहीत.

परराज्यात अडकलेल्यांना त्यांच्या गावी जाता यावे यासाठी केंद्र शासनाने आता सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. संकलित झालेली माहिती प्रशासनाकडून ऑनलाइन पद्धतीने भरण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रशासनाने रायगड जिल्ह्यात अडकलेल्या नागरिकांसाठी https://forms.gle/fgEGNoGTxber4HRs5 ही लिंक बनवून त्यात आपली माहिती ऑनलाइन भरण्यास सांगितली आहे, तर जिल्ह्यातील नागरिक बाहेरच्या राज्यात अडकले असतील तर त्यांच्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSfOouvUIšw6sXNvmi7pxSoryj3e3d2b7zOkIwmL8kY9Swnnnw/viewform?usp=sfšlink ही लिंक बनवली असून त्यात आपली माहिती भरण्याचे आवाहन केले आहे.

# पेणमध्ये सावकारी धंदा तेजीत

## लॉकडाऊनचा गैरफायदा घेणे सुरू

**पेण : प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लॉकडाऊनमुळे अनेक व्यवसाय ठप्प झाले आहेत. कित्येकांवर उपासमारीची वेळ आली आहे, परंतु पेण तालुक्यात सध्या अनधिकृतरीत्या चालणाऱ्या सावकारी धंद्याला तेजी आली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे पेणमध्ये सावकारी धंदा करणारे अनेक जण आपल्या गाड्यांना अत्यावश्यक सेवेचा बोर्ड लावून फिरताना दिसतात.

हे सर्व बेकायदेशीररीत्या सावकारीचा धंदा करतात. शेकडा पाच रुपयांपासून १० रुपयांपर्यंत महिन्याला व्याज आकारून पैसे पुरवतात. कित्येक जण पेणसह रायगडमध्ये अत्यावश्यक सेवेच्या नावाने घेतलेल्या पासेसचा दुरुपयोग करताना दिसतात. ज्या वेळी पोलीस यंत्रणेला पासचा दुरुपयोग होत आहे हे समजले त्यावेळी बऱ्याच जणांचे पासदेखील काढून घेतले आहेत, परंतु काही महाभाग

पोलीस यंत्रणेच्या डोळ्यांत धूळफेक करून सावकारीसारखा अनैतिक धंदा खुलेआम करीत आहेत.पेण शहरातील अनेक बड्या धेंडांचा यात समावेश आहे. एकीकडे लोक कोरोनाच्या संकटामुळे जीव मुठीत घेऊन जगत असताना लॉकडाऊनचा फायदा घेत सावकारी धंद्याद्वारे पैसे कमावले जात आहेत.

# खांदा कॉलनीत गरजूंना जेवणाची पॅकेट्स

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील यांच्याकडून महाराष्ट्र दिनाच्या व जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने खांदा कॉलनी येथील सेक्टर १२ मधील माता रमाई नगर, जय सेवालाल, व बालभारती जवळील झोपडपट्टी राहणाऱ्या नागरिकांना जेवणाची पॅकेट्सचे वाटप करण्यात आले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात लॉकडाऊन जारी केले आहे. त्यामुळे हातावर पोट असणारे, गरजू, कामगार, झोपडपट्टीधारक यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. अशावेळस त्यांना मायेचा घास भरविण्याचे कार्य गणेश पाटील यांनी केले आहे. त्यामुळे या सेवेचा लाभ घेतलेल्या गरजू नागरीकांनी त्यांचे आभार मानले.



**नवीन पनवेल : भाजपच्या वतीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची सेवा देणाऱ्या सेक्टर १, २, ३ मधील १५ सफाई कर्मचाऱ्यांचा कामगार दिनानिमित्त भाजप शहर मंडल वैद्यकीय सेलच्या संयोजिका ज्योती देशमाने यांनी मास्क, ट्रॉफी, साबण, चहा, बिस्किट, नाश्ता देऊन सन्मान केला.**

## पान १ वरून

पान १ वरून

### ‘आयएफएसी म्हणजे आपले अपयश लपवण्यासाठी छाती बडवण्याचा प्रकार’

२००७मध्ये व्हायब्रंट गुजरात समिटच्या वेळी गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी अहमदाबादला आयएफएससी म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला आणि नियोजनासाठी ईसीआयडीआयची नियुक्ती केली. २०१२पर्यंत गुजरात आयएफएससीचे सर्व आराखडे तयार झाले आणि कामालाही प्रारंभ झाला. २०१५मध्ये केंद्र सरकारने आयएफएससीसंदर्भात एसईझेडच्या कायद्यात बदल केल्यानंतर गिफ्टसिटीचा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्याचवेळी मुंबईचा प्रस्तावसुद्धा सादर करण्यात आला. अहमदाबादचा प्रस्ताव बऱ्याच बाबींची पूर्तता करीत पुढे गेल्याने त्याला मंजुरी मिळाली आणि ५० हेक्टर जागेमुळे बीकेसीच्या प्रस्तावात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यावरही सल्लागारामार्फत तोडगा शोधून पुन्हा हा प्रस्ताव फेरसादर करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारवर कायम टीका करण्यासाठी काही लोकांना केवळ सोयीच्या गोष्टींचे स्मरण होते, असा टोलाही या वेळी फडणवीस यांनी विरोधकांना लगावला.

### पनवेलमध्ये कोरोना रुग्णांचे शतक पूर्ण

नवीन पनवेल सेक्टर १७मधील २२ वर्षीय महिला मेंदू विकाराच्या तपासणीसाठी मुंबईला सायन हॉस्पिटलमध्ये गेली असताना तिला संसर्ग झाला असावा. कळंबोली सेक्टर ४मधील ३५ वर्षीय व्यक्तीचा भाऊ पोलीस कर्मचारी असून त्याच्यामुळे याला संसर्ग झाला असावा. शनिवारपर्यंत पनवेल महापालिका हद्दीतील १०१० जणांची टेस्ट केली आहे. त्यापैकी ६४ जणांचे रिपोर्ट अद्याप मिळाले नाहीत. कोरोना पॉझिटिव्हपैकी ५६ जणांवर उपचार सुरू असून, ३२ जण बरे झाल्याने त्यांना घरी पाठवण्यात आले आहे, तर आतापर्यंत दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

पनवेल ग्रामीणमध्ये शनिवारी दोन नवीन रुग्ण आढळले. उसर्ली येथील मोरया सोसायटीतील मुंबईला फार्मा कंपनीत जाणारी व्यक्ती आणि विचुंबे येथील मोरया पार्कमधील मुंबईला सफाई कामगार असलेली एक व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह झाली आहे. तालुक्यात कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या १०४ झाली असून, पनवेल ग्रामीणमध्ये १४पैकी पाच रुग्ण बरे झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे. गोवंडी येथील यूएसव्ही फार्मा कंपनीतील कामगारांना कोरोनाची लागण झाल्याचे दिसत असल्याने या कंपनीतील कामगार आणि त्यांचे नातेवाईक भयभीत झाले आहेत.

### उरणमधील पोलिसाच्या पत्नीलाही संसर्ग

उरणमध्ये लॉकडाऊनच्या कालावधीत कोरोनाचे चार रुग्ण आढळले होते. उपचारानंतर चारपैकी तीन रुग्ण ठणठणीत बरे होऊन घरी परतले आहेत. उर्वरित एक रुग्णही बरा झाला असून, त्याला लवकरच घरी सोडण्यात येणार असल्याचे समजते. त्यामुळे उरण तालुका कोरोनामुक्तीच्या दिशेने वाटचाल करीत असतानाच मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेल्या उरण मोरा येथील शिपायाला कोरोना झाला. त्याला प्रवासादरम्यान संपर्कातून लागण झाली असल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे. त्यानंतर क्वारंटाइन करण्यात आलेल्यांपैकी त्याच्या पत्नीला संसर्ग झाल्याने चिंता व्यक्त होत आहे.

# नवी मुंबईकरांसाठी रेड अलर्ट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात शनिवारी कोरोनाचे ३९ रुग्ण आढळल्याने नवी मुंबईचा आकडा २८९ वर पोहोचला आहे. शनिवारी एकूण १६८ रुग्णांचे अहवाल पोजिटिव्ह आले होते पैकी १२९ निगेटिव्ह आले.

नवी मुंबईत कोरोनाग्रस्तांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असून ती २८९ पर्यंत पोहोचली आहे. मुख्य म्हणजे कोरोनाधितांमध्ये मुंबईतून आलेल्या रुग्णांमुळे नवी मुंबईकरांना बाधा झाल्याचे समोर येत असल्याने नवी मुंबई शहर हे कम्युनिटी ट्रान्समिशनचा बळी ठरत असल्याचे निष्पन्न होऊ लागले आहे.

# नावडे ग्रामस्थांना धान्याचे वाटप

**कळंबोली : प्रतिनिधी**

कोरोना विषाणुचे जागतिक संकटावर मात करण्यासाठी देशासह राज्यात लॉकडाऊन करण्यात आला. लॉकडाऊनमुळे हाताला काम नसल्याने कोणावरही उपासमारीचे संकट येवू नये म्हणून नावडे गावातील समाजसेवक, समाजित कार्यकर्त, प्रतिष्ठीत व्यक्ती व राजकीय नेते एकत्र येवून पाच लाख रुपये जमा करून गावातील १५०० कुटूंबाना महिनाभर पुरेल, असे अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले.

लॉकडाऊनमुळे संपुर्ण उद्योगधंदे व व्यवसाय ठप्प झाले आहेत. हातावर पोट असलेला कामगार रोजनदार कामगार, नाकाकामगार, गरीब गरजू निराधार यांच्या उपासमारीचे वेळ आली आहे. नावडे गाव हा तळोजा ओद्योगिक विभागाला लागून असल्याने या गावात गरीब, गरजू, रोजंदारी कामगार व नाकाकामगारांची मोठी संख्या आहे. लॉकडाऊन वाढत चालल्यामुळे यांच्या हाताला काम नसल्यामुळे जगाचे कसे हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. याचा नावडे गावातील काही लोकांनी विचार करून गावातील समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठीत व्यक्ती व राजकीय नेते यांनी एकत्रीत येत अशा कुटूंबाना धान्याचे वाटप केले. या स्त्युत्य उपक्रमाबद्दल त्यांचे कामगार, गरीब गरजू व निराधार नागरिकांसह परिसरातून उदोउदो केला जात आहे.

# नागोठणे येथे फेस शिल्डचे वाटप

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील सुभाष ओटरमल जैन यांनी कोरोनाच्या लढाईत आपल्या प्राणाची बाजी लावून काम करणारी पोलीस यंत्रणा तसेच आरोग्य पथक आणि ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांना फेस शिल्डचे वाटप करून आपली कृतज्ञता व्यक्त केली.


जैन यांनी साहित्याचा संच पोलीस ठाणे, ग्रामपंचायत कार्यालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी जावून संबंधितांना प्रदान केला.



## दुखवटा

### शिवाजी साळोखे

**कर्जत :** डिकसळ येथील हभप शिवाजी पांडुरंग साळोखे यांचे हृदयविकाराचा झटका आल्याने निधन झाले. लॉकडाऊन असल्याने घरगुती पध्दतीने आणि कुटुंबातील नातेवाइक यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



असून अन्य सर्व विधी हे सोशल डिस्टन्सिंगची शिस्त पाळून केले जातील, असे जाहीर करण्यात आले आहे. हभप शिवाजी साळोखे यांच्या पश्चात मोठा परिवार आहे.

### आनंदीबाई ठोंबरे

**उरण :** पनवेल तालुक्यातील चिंचवण येथील सामाजिक कार्यकर्ते दामोदर बाळाराम ठोंबरे यांच्या मातोश्री गं.भा. आनंदीबाई बाळाराम ठोंबरे यांचे वृद्धापकाळाने शुक्रवारी (दि.१) निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्या पश्यात दोन मुलगे पंढरीनाथ ठोंबरे, दामोदर ठोंबरे, नातू जयेश पुंडलीक ठोंबरे, एक मुलगी, नातू, नाती असा मोठा परिवार आहे. गं.भा. आनंदीबाई बाळाराम ठोंबरे यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. १०) होणार असून उत्तरकार्य बुधवारी (दि. १३) राहत्या घरी चिंचवण येथे होणार आहे.



## निवडक

### सुनील लोणकरांना पोलीस पदक

**पनवेल :** रेल्वे विभागात कार्यरत असणारे पोलीस हवालदार सुनील सुदाम लोणकर यांना त्यांच्या उत्तम सेवाभिलेखाबद्दल मा.पोलीस महासंचालक यांचे बोधचिन्ह (पोलीस पदक) जाहीर झाले आहे. मुंबई रेल्वे पोलीस



आयुक्तालयातील कार्यक्षम व सदस्य प्रशासनाचे कामात तत्पर असलेले सर्वांना सहकार्य करण्याची भावना व मुंबई रेल्वे आयुक्तालयातील पहिल्या एन्कांऊंटरमध्ये सहभागी असलेले त्याचप्रमाणे आयुक्तालयातील एमपीडीए अंतर्गत कारवाईचा पहिला प्रस्ताव तयार करणारे पोलीस हवालदार सुनील लोणकर यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने उत्तम सेवाभिलेखाबद्दल मा.पोलीस महासंचालक यांचे बोधचिन्ह (पोलीस पदक) जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सहकारी बांधवांना, तसेच नातेवाईकांना व मित्र परिवारांनी अभिनंदन केले आहे.

### गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**पनवेल :** कोरोना साथीचा आजार हा संपूर्ण जगामध्ये थैमान घालत आहे. हा रोग पसरू नये यासाठी शासनाकडून करण्यात आलेल्या व दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लॉकडाऊनमुळे अनेकांची कामे बंद पडून काही कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. पनवेलमधील श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट व पत्रकार मित्र असोसिएशन हि संस्था आजपर्यंत स्वखर्चाने शक्य तितक्या अत्यंत गरजू नागरिकांना अन्न धान्याचे वाटप करीत आहे. पनवेल येथील खांदा वसाहत येथील अत्यंत गरजू रिक्षाचालकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच उसर्ली-विचुंबे येथील संपर्क केलेल्या अत्यंत गरजू नागरिकांना तांदूळ, तेल, मीठ, डाळ आदी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

# एपीएमसीत भाज्यांची आवक निम्म्यावर

**पनवेल : बातमीदार**

कोरोना विषाणूची १४ जणांना लागण झाल्याने भाजीची वाहतूक करणारी निम्मीच वाहने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घाऊक भाजी बाजारात शुक्रवारी (दि. १) दाखल झाली. गुरुवारी बाजारात भाजीची १६९ वाहने आली होती, तर शुक्रवारी भाज्यांची ९५ वाहने बाजारात आणली गेली. याच वेळी शनिवारपासून भाजी बाजारातील व्यापाऱ्यांनी तुरळक भाजीची मागणी कमी करण्याचा निर्णय घेतल्याने बाजारात 'बंद'चे स्वरूप आले आहे.

**बाजाराला 'बंद'चे स्वरूप**

कोरोनाबाधितांचा आकडा अधिक असल्याने मुंबई महानगर क्षेत्रात टाळेबंदी कायम ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. बाजारात सध्या व्यापारी, काही माथाडी, मापाडी, वाहतूकदार आणि सर्वाधिक खरेदीदार अशी गर्दी होत आहे. व्यापाऱ्यांनी गुरुवारी शेतमालाची कमी मागणी नोंदविल्याने भाजीची १६९ वाहने एपीएमसीमध्ये आली होती. शुक्रवारी ही संख्या निम्म्यावर आली होती. शनिवारी ही संख्या याहून कमी होणार आहे. त्यामुळे एपीएमसीत अघोषित बंद असेल.

**नोटीस व संक्रमणाचेही भय**

**घाऊक बाजारात कोरोना रुग्णांची संख्या २०च्या घरात गेली आहे. त्यांच्या संपर्कात किती जण आले होते, याची तपासणी सुरू आहे. बाजार बंद करण्याचा सामूहिक निर्णय घेतल्यास समिती कारवाईची नोटीस बजावत आहे आणि बाजार सुरू ठेवल्यास कोरोनाचे भय आहे. अशा स्थितीत व्यापाऱ्यांनी शेतमालाची मागणी कमी करण्याचा निर्णय घेतल्याचे कळते.**

भाजी बाजारात खरेदीदारांची गर्दी होत आहे. ही खरेदी नागरिकांच्या सेवेसाठी नसून नफा कमावण्यासाठी आहे, असा आरोप काही व्यापाऱ्यांनी केला आहे. एखाददुसरा खरेदीदार पोलिसांच्या भीतीने काही काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करतो. मात्र, पोलिसांची पाठ फिरताच टाळेबंदीचे सारे नियम धाब्यावर बसवले जातात. त्यामुळे व्यापारी वर्ग चिंतेत आहे.

### सफाई कामगारांना मार्गदर्शन

**कामोठे : महापालिकेच्या सफाई कामगारांना कोरोनाबाबत घ्यावयाच्या काळजीविषयी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी सखोल मार्गदर्शन केले.**



### व्यावसायिकाची फसवणूक

**पनवेल :** कुरिअरद्वारे २० हजार तोंडाला लावण्याचे मास्क पाठविण्याचा बहाणा करुन एका भामट्याने कोपरखैरणेतील व्यावसायिकाकडून सव्वा दोन लाख रुपये उकळून त्याची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

व्यावसायिकाने दिलेल्या तक्रारीनंतर कोपरखैरणे पोलिसांनी या प्रकरणातील भामट्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

## पिडिलाईट कंपनी, टिआयएतर्फे पोलिसांना पीपीई किट वाटप

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबईतील पोलीस आयुक्तालयाच्या अधीन असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना वैयक्तिक संरक्षणात्मक किट वितरित करण्यासाठी भारत आधारित ॲडव्हाईज मॅन्युफॅक्चरिंग कंपनी पिडिलाईट इंडस्ट्रीज जी फेविकॉल आणि तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी पिडिलाइट उद्योगांच्या वतीने तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक काशिनाथ चव्हाण यांच्याकडे १८० वैयक्तिक संरक्षक किट हस्तांतरित केल्या. तसेच डिसीपी झोन दोनमध्ये अशोक दूधे यांच्याकडे ५८० वैयक्तिक संरक्षण किट सुपूर्द करण्यात आल्या.



प्रत्येक संरक्षक किटमध्ये १० फेस मास्क, दोन हातची दस्ताने, एक सॅनिटायझर इत्यादी साहित्याचा समावेश होता. तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने (टीआयए) तळोजा एमआयडीसी मधील उद्योगांना संपर्क साधून तळोजा एमआयडीसी मधील गरीब लोकांसाठी अन्नधान्याच्या पिशव्या खरेदी व वाटप करण्यात मदत करणे. कोविड १९ ला लढा देण्यासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय उपकरणे, तरतुदींच्या खरेदीसाठी मदत करणे या साठी उद्योजकांनी पुढे येण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाचा आधार घेऊन तळोजा एमआयडीसीमधील पिडिलाइट इंडस्ट्रीज लिमिटेड पुढे आले आणि त्यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाला वैयक्तिक संरक्षक किट वाटप करण्याची इच्छा टिआयएचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांच्याकडे व्यक्त केली.

या वेळी बी.जी. एंटरप्राइझचे प्रोप्रायटर बाबू जॉर्ज, बी.जी. एंटरप्राइझचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीनू पपाचन, टिआयएचे अध्यक्ष सतिश शेट्टी आणि टीआयएचे कार्यकारी सचिव सुनील पाध्ये उपस्थित होते.

## गावागावांत जनता कर्फ्यूची हाक

**पनवेल : बातमीदार**

नवी मुंबईत कोरोना रुग्णांची वाढती संख्या सर्वांच्या चिंतेचे कारण ठरली आहे. त्यामुळे नवी मुंबईतील गावागावांत स्वयंघोषित जनता कर्फ्यूचे आवाहन करण्यात येत आहे. घणसोली गावात सलग सहा दिवस जनता कर्फ्यूचे आवाहन करण्यात आले असून मंगळवारपासून गावात हा कर्फ्यू लागला आहे. त्यामुळे गावातील सर्व व्यवहार ठप्प आहेत. कोपरखैरणेतील ग्रामस्थांनीही जनता कर्फ्यूची हाक दिली आहे.

पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी अत्यावश्यक सेवेसह अन्य दुकाने दिवसभर बंद ठेवण्यात आली. वृद्ध, दिव्यांग आणि गरोदर महिला तसेच रुग्णांसाठी अत्यावश्यक मोफत वैद्यकीय सेवेसाठी गावकीच्या वतीने ३ मेपर्यंत एक रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त अन्य कोणतीही वाहने गावात फिरणार नाहीत, हेही स्पष्ट केले आहे आणि सर्वांना गावात घरातच राहण्याचे आवाहन गावकीच्या वतीने करण्यात आले आहे.

घणसोली परिसरात आतापर्यंत १० जणांना कोरोनाची लागण झाली आहे. औषधांची दुकाने आणि दवाखाने वगळता गावातील किराणा दुकाने, भाजीपाला, दूध, मासळी, चिकन आणि मटण दुकाने बंद ठेवून कडकडीत बंद पाळण्यात आला. घणसोली गावात येण्या-जाण्यासाठी एकूण ११ प्रवेशद्वारे आहेत. येथे ग्रामस्थांनी बॅरिकेड्स लावून रस्ता बंद करून बाहेरील व्यक्तीला प्रवेशबंदी केली आहे.

## कम्युनिटी किचनसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि खारघर भाजप यांच्या वतीने अन्नछत्र (कम्युनिटी किचन) सुरु करण्यात आले आहे. या अनुषंगाने नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत शनिवारी (दि. २) अनेक जणांनी आर्थिक मदत केली.

यामध्ये ईश्वर नारायण पटेल १०,००० रुपये, दुर्गादास महाजन ११०० रुपये, संजय गौतम १००१ रुपये, जंथलारू नागराज २५०० रुपये, विशाल अग्रवाल २५०० रुपये, कै. उल्हास प्रधान यांच्या स्मृती प्रित्यर्थ २००१ रुपये, विजय साबळे १००० रुपये, अनिल खोपडे १००० रुपये, गुप्त अन्नदाता १००१ रुपये, टीना राज साबळे २१०० रुपये, डॉ. हर्षल सूर्यवंशी १००० रुपये, नितीन पाटील (एरंडोल, जळगाव) १००० रुपये, सुभाष पवार (उल्हासनगर) १००० रुपये, तसेच अब्दुल रहीम सुर्वे (दुबईस्थित) यांच्या पत्नी नर्गिस सुर्वे यांनी या अन्नछत्रात ५६ किलो बटाटे व १२ किलोचा तेलाचा डबा देऊन सामाजिक बांधिलकी जपत आपले योगदान दिले.



## तीन महिन्यांचा मालमत्ता, पाणी कर माफ करा

**आमदार गणेश नाईक यांची मागणी**



**नवी मुंबई : बातमीदार**

कोरोना व्हायरसमुळे सुरू असलेल्या लॉकडाऊनचा अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम झालेला आहे. उद्योग, व्यवसाय आणि रोजगार-स्वयंरोजगार ठप्प झाल्याने विविध शासकीय देयके भरताना नाकीनऊ येणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक आणि लघु उद्योजकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेने तीन महिन्यांचा मालमत्ता व पाणी कर माफ करावा, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी नवी मुंबईचे महापौर जयवंत सुतार आणि महापालिका आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मार्चपासून सुरू झालेल्या लॉकडाऊनमुळे कामगार वर्ग घरी बसला आहे. कारखाने बंद आहेत. स्वयंरोजगार देखील करता येत नाही. उदरनिर्वाहाची साधने लॉक झाली आहेत. नागरिकांचे आणि विशेषतः लघुउद्योजकांचे उत्पन्न गोठले असून दुसरीकडे शासकीय देयकांचा मोठा भार आहे. या संकटकालीन परिस्थितीमध्ये या घटकांना थोडाफार दिलासा देण्यासाठी महापालिकेने पुढाकार घ्यावा, अशी सूचना करीत आमदार नाईक यांनी किमान एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांचा निवासी मालमत्तासाठी आणि लघु उद्योजकांसाठी मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर माफ करावा, अशी आग्रही मागणी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

## खांदा कॉलनीतील कामे पावसाळ्यापूर्वी तातडीने करण्यात यावी -गणेश पाटील

**कळंबोली : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खांदा कॉलनी वसाहतीतील नाले, गटारे सफाई, रस्त्यांची डागडुगी तसेच फुटपाथची दुरूस्ती पावसाळ्यापूर्वी करण्यात यावी, अशी मागणी माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे. ही सर्व कामे प्रकल्पग्रस्त करत आले आहेत पण यावर्षी कोरोना महामारीचा फायदा उठवत सिडको अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर अन्याय केला आहे, अशी नाराजी पाटील यांनी व्यक्त केली.



पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने खांदा कॉलनीत मोठ्या प्रमाणावर पाणी साचते. नाले, गटारे तुडुंब भरून रस्त्यावर व परिसरात घाण पाणी साचून राहिल्याने रोगराई तसेच डेंग्यु व मलेरियासारखे साथीचे आजार पसरत आहेत. आरोग्यविषयक अनेक बिकट समस्या निर्माण होवून नागरिकांचे जीवन धोक्यात येत आहेत. गटारे व नाल्यांची साफसफाई पावसाळ्यापूर्वी होत नसल्याने शहरात पाणी साचून रस्ते घाण पाण्याखाली जात आहेत.

मोठ्या प्रमाणात माती व कचरा जमा होत असतो, तसेच नाले व गटारात प्लास्टिकच्या पिशव्या व गाळ साचल्याने पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होवून गटारे तुंबली जावून परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. ते पाणी रहिवाश्यांच्या घरांत व दुकानांत शिरत असल्याने त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. गटारात प्लास्टीक पिशव्या व गाळ साचल्याने ती तुंबल्याने शहरात पूरस्थिती निर्माण होते. नाले, गटार सफाई रस्त्यांची डागडुगी व फुटपाथची दुरूस्ती कामे येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त करत आले आहेत आणि तेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. पण या वेळी कोरोना महामारीचा फायदा उठवत नवीन पनवेल पूर्व व नवीन पनवेल (प) म्हणजेच खांदा कॉलनी, धाकटा खांदा, व मोठा खांदा येथील रस्ते डांबरीकरण व त्यांची दुरूस्ती, फुटपाथ दुरुस्ती, नाले, गटार सफाई या सर्व कामाची निविदा झेनिथ कन्स्ट्रक्शन या कंपनीला देवून प्रकल्पग्रस्तांवर अन्याय केला आहे.

शहरातील जनतेचा विचार करून ही कामे पावसाळा सुरू होण्यापूर्वी तातडीने करण्यात यावी, अशी विनंती पनवेल महानगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे.

# परराज्यात जाणाऱ्या ५७ जणांची धरपकड

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई, नवी मुंबई परिसरात राहणाऱ्या परराज्यातील नागरिकांची आपल्या मूळगावी परतण्याची धडपड अद्याप सुरुच असून पहाटे पनवेल येथून सायकलवरुन उत्तर प्रदेश येथे जाणाऱ्या अशाच ५७ व्यक्तींची तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी धरपकड केली आहे. पोलिसांनी या सर्वांवर तसेच त्यांना सायकल विकत देणाऱ्या तीन सायकल दुकानदारांवर गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी या सर्व व्यक्तींना १५ दिवसांचे अन्नधान्य देऊन ते रहात असलेल्या ठिकाणी त्यांना परत पाठवुन दिले आहे.

या प्रकरणात पकडण्यात आलेल्या ५७ व्यक्तींपैकी बहुतांश जण हे पनवेलच्या बम्बई पाडा येथे तर काही तुर्भे इंदिरा नगर भागात राहणारे आहेत. तसेच हे सर्वजण उत्तर प्रदेश राज्यातील असुन सध्या ते नवी मुंबई-पनवेल भागात विविध ठिकाणी काम करुन आपला उदरनिर्वाह करत आहेत. कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन जारी करण्यात आल्यामुळे मागील दिड महिन्यांपासून त्यांचे कामधंदे बंद झाल्याने त्यांची उपासमार सुरु होती. त्यामुळे या सर्व कामगारांनी एकत्र येऊन पनवेलच्या तीन सायकल दुकानदारांकडून सायकली विकत घेतल्या होत्या. त्यानंतर बुधवारी पहाटेच्या सुमारास हे सर्वजण सायकलवरुन पनवेल येथुन उत्तर प्रदेश येथे निघाले होते. हे सर्वजण तुर्भे महापे मार्गे पुढे जाणार असल्याने त्यांच्या ताफ्यामध्ये तुर्भे इंदिरा नगरमध्ये रहाणारे काही नागरिक सहभागी होणार होते. त्यामुळे हे सर्वजण सायकलवरुन मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास तुर्भे इंदिरानगर येथे आले असता त्याठिकाणी बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी या सगळ्यांची धरपकड करुन त्यांची चौकशी केल्यानंतर ते सर्वजण उत्तरप्रदेश येथे निघाल्याचे निदर्शनास आले.

त्यानंतर पोलिसांनी ५७ जणांना सायकलींसह पोलीस ठाण्यात आणून कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने त्यांचे अशा पद्धतीने उत्तरप्रदेश येथे जाणे योग्य नसल्याचे त्यांना पटवून दिले. त्यानंतर त्या सर्वांना १५ दिवसांचे अन्नधान्य देऊन ते राहत असलेल्या ठिकाणी त्यांना परत पाठवून दिले. या ५७ जणांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याने त्या सर्वांवर तसेच त्यांना सायकल विकत देणाऱ्या तीन दुकानदारांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## सोडिअम हायफोक्लोराईड फवारणीसंदर्भात बैठक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती प्रवीण काळुराम पाटील यांनी पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी भगवान पाटील (प्रभाग समिती अ), आरोग्य निरीक्षक दौलत शिंदे (प्रभाग समिती अ), आरोग्य निरीक्षक खारघर विभाग जितेंद्र मढवी यांच्या सोबत शनिवारी (दि. २) सोडिअम हायफोक्लोराईड फवारणीसंदर्भात एक आढावा बैठक घेतली.

दिवसेंदिवस खारघरमधील कोरोना रुग्णांची संख्या वाढत असून नागरिकांच्या सोडिअम हायफोक्लोराईड फवारणी संबंधात तक्रारी येत होत्या. ज्या इमारतीमध्ये कोरोना रुग्ण सापडत आहेत, त्या इमारतीमध्ये तातडीने सोडिअम हायफोक्लोराईडची फवारणी करण्यात येत आहे आणि या इमारतीच्या आजूबाजूला सुद्धा फवारणी करण्यात यावी, अशी विनंती अधिकारीवर्गाला करण्यात आली.



जा.क्र.उनप/आरोग्य/१६३/२०२०-२०२१
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :-०२/०५/२०२०

**जाहीर सुचना**

उरण नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सुक्या कचऱ्याचे विक्री करणेत येणार आहे. तरी इच्छुक भंगार खरेदीदार यांनी त्यांच्या लेटर पॅडवर पुठ्ठा, काच, प्लास्टिक, बॉटल, पेपर, प्लास्टिक बॉटल, चामडे, पत्रा, कापड इत्यादीचे दरपत्रक दिनांक : १०-०५-२०२० पर्यंत सादर करणेचे आहेत. दरपत्रकासोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड व अनुभवाची कागदपत्रे सादर करणेचे आहे.

सही/-
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद

# देवेंद्र फडणवीस यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यांवर कारवाई करावी

## खोपोली शहर भाजपची मागणी


(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री व विद्यमान विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या प्रत्येक कृतीवर सामाजिक माध्यमांमध्ये असंसदीय शब्दांत टीका केली जात आहे. घाणेरडी अश्लील व्यंगचित्रे पोस्ट करण्यात येत आहेत. ही टीका अत्यंत हीन दर्जाची आहे.

फडणवीस हे राज्याच्या राजकारणातील लोकाभिमुख, सुसंस्कृत व निष्कलंक व्यक्तिमत्त्व आहेत, परंतु हे भान न ठेवता काही जण गलिच्छ प्रकार करीत आहेत. या प्रकरणाची तत्काळ चौकशी करून असे कृत्य करणाऱ्या समाजकंटकांविरोधात कारवाई करावी, अशी मागणी शहर भाजपच्या वतीने निवेदनाद्वारे खोपोली पोलिसांकडे करण्यात आली आहे.

या वेळी खोपोली भाजप अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, जिल्हा महिला अध्यक्ष अश्विनी पाटील, शहर सरचिटणीस हेमंत नांदे, ईश्वर शिंपी, राकेश दबके आदी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक धनाजी क्षीरसागर यांनी याबाबतचे निवेदन स्वीकारले.

# आरोग्य प्रहर

## व्यायाम आणि आहार

फिटनेसविषयीची जागृती एका वर्गापुरती मर्यादित होती, मात्र आता शारीरिक स्वास्थ्य आणि उत्तम आरोग्य मिळवण्यासाठी तरुण वर्गापासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांचाच व्यायामाकडे कल वाढत आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये फिट राहण्यासाठी व्यायाम जितका आवश्यक आहे, तितकेच आहारावर लक्ष देणे गरजेचे आहे. उपाशीपोटी व्यायाम केला पाहिजे, व्यायाम करताना पाणी पिऊ नये, व्यायामानंतर भरपूर खावे अशा अनेक गैरसमजुती लोकांमध्ये असतात.

* शहरातील व्यग्र जीवनामध्ये व्यायाम केव्हा करावा हे सोयीने ठरवावे, मात्र व्यायामाआधी आणि नंतर काय खावे याचे गणित कोणत्याही वेळेस व्यायाम केला तरी सारखेच आहे.

* व्यायाम करण्याच्या सुमारे अर्धा तास आधी हलका आहार घ्यावा, ज्यामध्ये कोणतेही एखादे फळ खाल्ल्यास उत्तम. फळामध्ये असलेली कार्बोहायड्रेट आणि पाणी व्यायाम करताना शरीरातील ऊर्जा टिकवून ठेवतात. दोन ते तीन खजूर आणि लिंबूपाणी प्यायले तरी चालेल.



* व्यायामादरम्यान पाणी पिऊ नये हे साफ चुकीचे आहे. व्यायाम करताना येणाऱ्या घामावाटे शरीरातील पाणी कमी होत असते. अशा वेळी पाण्याची शरीराला आवश्यकता असते. त्यामुळे व्यायाम करताना पाणी प्यावे. पाण्याऐवजी काळे मीठ घातलेले लिंबूपाणी प्यायले तरी चालेल.

* व्यायामानंतर बऱ्याचदा लोक घरी गेल्यावर जेवणाच्या ताटावर बसतात. व्यायाम करून घरी आल्यानंतर आंघोळ करावी. त्यामुळे शरीराला थोडा आराम पडतो. त्यानंतर साधारणपणे प्रथिनयुक्त पदार्थ थोड्या प्रमाणात खावेत. यामध्ये चणे, शेंगदाणे (फक्त मूठभर) खावेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रथिने शरीराला मिळतात. अंजीरसारखे सुके फळ खाल्ले तरी चालेल, परंतु हा आहार थोडकाच असावा. यानंतर साधारण अर्ध्या तासाने जेवण किंवा न्याहरी करावी.

* जिममध्ये जाणाऱ्यांना बहुतांश वेळा प्रथिने असलेले शेक किंवा पावडर खाण्यास दिल्या जातात. अशा प्रकारच्या पावडर या जंकफूडप्रमाणे असून यापेक्षा ताजी फळे आणि भाज्या खाणे केव्हाही चांगले.

* व्यायामाच्या आधी किंवा नंतरच्या आहारामध्ये लिंबूपाणी किंवा कोकम सरबत अशी पेये घेत असाल तर त्यामध्ये साखर शक्यतो कमीच वापरा.

# माथेरानमधील घोड्यांसाठी खाद्यवाटप

**कर्जत : बातमीदार**


(छाया : संतोष पेरणे)

कर्जत तालुक्यातील मुंबईपासून सर्वांत जवळ असलेल्या माथेरान या पर्यटनस्थळी पर्यटकांच्या सेवेसाठी असलेले घोडे संकटात आहेत. त्यांना चारा आणि खुराक ही अत्यावश्यक असलेली वैरण संपली आहे. त्यामुळे घोड्यांची सुरू असलेली उपासमार लक्षात घेऊन अश्वपाल जानू ढेबे यांच्या पुढाकाराने एक एनजीओ पुढे आले आहे. दरम्यान, या एनजीओने सलग तिसऱ्या टप्प्यात घोड्यांसाठी चारारूपी खाद्य उपलब्ध करून दिले आहे.

माथेरानमध्ये पर्यटकांच्या सेवेसाठी मोठ्या प्रमाणात घोडे असून त्या घोड्यांच्या माध्यमातून ४०० कुटुंबे आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. माथेरानमध्ये लॉकडाऊन असून या लॉकडाऊनमुळे माथेरानमध्ये बाहेरून कोणीही येत नाही. परिणामी माथेरानमधील पर्यटन व्यवसाय १०० टक्के ठप्प झाला आहे. ही बाब लक्षात घेता घोड्यांकडून होणारा व्यवसाय बंद आहे आणि त्यामुळे घोड्यांना दररोज द्यावा लागणारा चारा देणेदेखील कठीण झाले आहे. त्यामुळे ४००हून अधिक घोड्यांची उपासमार चालली होती. त्यावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात हात पुढे आले असून चारा खाद्याची मदत होत आहे, पण घोड्यांची भूक लक्षात घेता त्यांना दररोज खुराक देणे अश्वपालकांना शक्य नाही. ही बाब लक्षात घेऊन माथेरानमधील अश्वपालक जानू ढेबे यांनी आपल्या ओळखीच्या माध्यमातून एक एनजीओ गाठली आणि त्यांना माथेरानमधील घोड्यांची माहिती दिली. त्या संस्थेच्या माध्यमातून माथेरानमधील घोड्यांसाठी खाद्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

कोरोनाचे संकट आणि माथेरानमध्ये वाढलेला लॉकडाऊन लक्षात घेऊन माथेरानमध्ये व्यवसाय करणाऱ्या घोडेवाल्यांनी जानू ढेबे यांच्याकडे एनजीओकडून मदतीची मागणी केली होती. जुम्मापट्टी, आसल, धनगर तप्पा, लव्हाळी, नेरळ, भडवळ, धोत्रे, खैराट, दाम खिंडी, वाघेश्वर, दामत, जाधव वाडी या गावांतील अश्वपालकांनी मागणी केली होती. त्यानुसार माथेरानमध्ये येऊन व्यवसाय करणाऱ्या अश्व मालकांना एनजीओ संस्थेचे सदस्य तसेच सचिन ढेबे, नरेंद्र ढेबे यांच्या उपस्थितीत अश्वपालकांना ५० किलोच्या १०० गोणी भुसा हे खाद्य वाटप करण्यात आले.

# शहर निर्जंतुकीकरणासाठी अत्याधुनिक फॉगिंग मशिन

## स्वाध्यायी परिवाराचा पुढाकार

**रोहे : प्रतिनिधी**

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी देशात व राज्यात अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याबरोबरीनेच सामाजिक संस्था, संघटनाही कोरोनाशी लढा देण्यासाठी पुढे येत आहेत. गीतेचे सार जगाला सांगणारे प. पु. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्यायी परिवाराच्या वतीने रोह्यात अत्याधुनिक फॉगिंग मशिन देण्यात आले असून रोह्यात या मशिनच्या साह्याने फवारणी सुरू आहे.

ज्या वेळी एखादी सामाजिक आपत्ती येते तेव्हा प. पु. पांडुरंगशास्त्री आठवले (दादाजी) यांच्या प्रेरणेने व त्यांची कन्या धनश्री आठवले-तळवळकर (दीदी) यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाध्याय परिवाराने सामाजिक आपत्तीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी भरीव कार्य केले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर स्वाध्याय परिवाराने कोरोनाविरोधात लढण्यासाठी उपाययोजनांसाठी सहभाग घेतला आहे. हमरस्ते, मार्केट्स आणि वस्त्यांचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी स्वाध्याय परिवारातर्फे दूरवर व शक्तिशाली पद्धतीने औषध फवारणी करू शकेल असे अत्याधुनिक फॉगिंग मशिन राज्याच्या आरोग्य विभागाला प्रदान केले होते. राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी त्याबद्दल स्वाध्याय परिवाराचे विशेष कौतुकसुद्धा केले आहे. अशाच प्रकारचे एक मशिन धनश्री आठवले-तळवळकर यांनी रोहा शहरासाठी रोहे अष्टमी नगर परिषदेकडे पाठवले आहे. २९ एप्रिल रोजी पांडुरंगशास्त्री यांच्या निवासस्थानापासून श्रीफळ वाढवून रोह्यातील रस्त्यारस्त्यांवर औषध फवारणी करून संपूर्ण शहर निर्जंतुकीकरण करण्यास सुरुवात झाली आहे.

# ऑनलाइन ई-म्युझिकल किक बॉक्सिंग स्पर्धेस प्रतिसाद


सलोनी सावंत

**पेण : प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक खेळाडू घरीच सराव करीत आहेत. त्यानुसार कराटेचा सराव सक्रिय ठेवण्यासाठी वाको महाराष्ट्र किक बॉक्सिंग असोसिएशनने राज्यस्तरीय ऑनलाइन ई-म्युझिकल किक बॉक्सिंग चषक स्पर्धा २८ व २९ एप्रिल रोजी आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत अहमदनगर, बीड, मुंबई, पालघर, वसई, विरार, पनवेल, रायगड, औरंगाबाद, वर्धा, वाशिम, ठाणे, सोलापूर, सांगली, पुणे, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, बुलढाणा, नागपूर अशा जिल्ह्यांमधून २०७ खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धकांनी आपल्या घरी राहून २०७ खेळाडूंनी म्युझिकल फोम करून व्हिडीओ असोसिएशनला पाठविले. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेत रायगड जिल्ह्यातून कौस्तुभ दास (गोल्ड-पेण), सौम्या झिंजे (सिल्व्हर-पेण), रविना म्हात्रे (ब्राँझ-पेण), सलोनी सावंत (ब्राँझ-पेण), हर्षदा मोकल (ब्राँझ-खांदा कॉलनी, पनवेल), अथर्व मसुरकर (ब्राँझ-खांदा कॉलनी, पनवेल) यांनी सुयश मिळविले.


कौस्तुभ दास


सौम्या झिंजे


रविना म्हात्रे

या वेळी पंचांनी आपल्या घरी राहून झूम ॲपद्वारे सदर स्पर्धेचा निकाल दिला. स्पर्धा तांत्रिक अधिकारी म्हणून प्रवीण काळे (सांगली), इन्चार्ज सूर्यप्रकाश मुंडाप्पा (वसई-विरार), इक्बाल शेख (पिंपरी-चिंचवड), सुरेश मिरकर (औरंगाबाद), सागर सुर्वे (पुणे), कृष्णा ढोबळे (वर्धा), रवींद्र म्हात्रे (रायगड), संतोष खंदारे (मुंबई), मंदार पनवेलकर (पनवेल), सपना मॅडम (पालघर), सिद्धार्थ बनसोडे (पिंपरी-चिंचवड) यांनी पंच म्हणून काम पाहिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्रशिक्षक रवींद्र म्हात्रे व मंदार पनवेलकर यांनी कौतुक केले आहे.

# वासुंडे ग्रामस्थांकडून गरजूंना धान्यदान

**पाली : प्रतिनिधी**

कोरोनाच्या वैश्विक महामारीत सुधागड तालुक्यातील वासुंडे ग्रामस्थांनी एक आदर्शवत व सेवाभावी उपक्रम हाती घेतला आहे. माणुसकी व सामाजिक बांधिलकी जपत स्वयंस्फूर्तीने गरीब व गरजवंतांना धान्य दानाची अनोखी मोहीम या गावात राबविली जात आहे. टाळेबंदीत श्रमजीवी, कष्टकरी मजूर, हातावर पोट असलेले आदिवासी बांधव यांची परिस्थिती आणखीनच बिकट झाली आहे. टप्प्याटप्प्याने वाढ होत असलेला लॉकडाऊनचा कालावधी व हाती रोजगार नसल्याने अनेक कुटुंबांवर अक्षरशः उपासमारीची वेळ आली आहे. या काळात कुणाचीही उपासमार होऊ नये या हेतूने वासुंडे गावचे रास्त भाव दुकानदार हरीचंद्र पाटील यांनी ग्रामस्थांपुढे या सेवाभावी उपक्रमाचा प्रस्ताव ठेवला.

ग्रामस्थांनी क्षणाचाही विलंब न लावता तत्काळ धान्य गोळा करून गरजवंतांना देण्यास प्रारंभ केला. स्वयंस्फूर्तीने स्वतः ला मिळालेले धान्य गरीब, गरजवंतांना वाटप करणारे हे एकमेव गाव ठरल्याचे कौतुक पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी केले.



कोरोना आपत्तीच्या अनुषंगाने गावोगावी नागरिकांना रास्त भाव धान्य दुकानातून धान्य व जीवनावश्यक साहित्य मिळत आहे, मात्र समाजातील काही घटक आज या लाभापासून वंचित आहेत. या जाणिवेतून समाजातील मध्यमवर्गीय घटकाने पुढाकार घेत धान्य दान करण्याची संकल्पना राबवली आहे. सुधागड तालुक्यात लॉकडाऊनमध्ये ठिकठिकाणी मजूर, आदिवासी बांधव, मेंढपाळ अडकून पडले आहेत. अशा गरजवंतांना सदरच्या अन्नधान्याचा मोठा आधार ठरणार असून वासुंडे ग्रामस्थांनी हाती घेतलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार आ. रविशेठ पाटील यांनी काढले.

सदर धान्यदान कार्यक्रमास आ. रविशेठ पाटील, पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायन्नावार, राजेश मपारा, सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पाटील, उपसरपंच विलास पालवे, मनीष पालवे, ग्रामपंचायत सदस्य श्याम दळवी, ग्रामसेवक पवार, पांडुरंग दळवी, श्रीकांत सरनाईक, गणेश दळवी, कृष्णा दळवी आदी उपस्थित होते.

# मूळगावी जाण्यासाठी ग्रामपंचायतीत नावनोंदणी

**नागोठणे : प्रतिनिधी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक कंपन्या बंद पडल्या आहेत. तसेच रोजंदारीवर काम करणारे कारागीर आणि मजुरांना रोजगारच उपलब्ध नसल्याने शेकडो परप्रांतीयांनी आपल्या मूळगावी जाण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायत कार्यालयात या लोकांनी आपली नावे नोंदवली आहेत.

बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, झारखंड, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, कर्नाटक आदी राज्यांतील नागरिकांचा समावेश आहे. याचबरोबर आपल्या मूळगावी जाण्यासाठी मराठी नोकरदार वर्ग आणि कामगारांनीसुद्धा आपली नावे नोंदवली असून त्यात कोकणासह मराठवाडा, विदर्भ तसेच पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा समावेश आहे. शासनाच्या निर्देशानुसार येथे नोंदणी करण्यात येत असून ही यादी तहसील कार्यालयात पाठविण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. आतापर्यंत या ठिकाणी २०६ जणांनी आपल्या नावांची नोंद केली आहे.

# पेण येथे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने कंत्राटी सफाई कामगारांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप मुख्याधिकारी अर्चना दिवे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी नगर परिषदेच्या १०८ कंत्राटी कामगारांना पेण न.पा. तील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वर्गणी काढून तांदूळ, तेल, तूरडाळ, मीठ आदी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. या उपक्रमास आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, सोनावणे, सुर्वे तसेच सर्व सफाई कामगार व सर्व शाळांचे शाळाप्रमुख, पेण नगरपरिषद शिक्षक संघाचे अध्यक्ष सुरेश अलकुंटे, साधना कांबळे, मदन कोळी, संघटनेचे सरचिटणीस दशरथ एरणकर, सुचिता जोशी यांचे सहकार्य लाभले.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com